N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** चामोर्शी **Year (वर्ष):** 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0455 **Date and Time of FIR (**प्र. ख. दिनांक आणि वेळ**):** 22/11/2019 22:21 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शुक्रवार
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 22/11/2019
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/11/2019
      **Time From (वेळेपासून):** 13:55 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 17:55 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 22/11/2019 **Time (वेळ):** 22:16 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद** 046 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/11/2019 22:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 18 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** मुरमुरी गावाजवळील पोर नदीजवळ ,चामोर्शी , 442603

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** श्री. सागर तुकडुदास शेंन्डे
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
   (c) **Date/Year of Birth (जन्म** 1996 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
   **Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | माल्लेरमाल,चामोर्शा,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |
| 2 | स्थायी पता | माल्लेरमाल,चामोर्शा,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.विलास माधवराव मुप्पीडवार | | | 1. रा-मारोती शो रुम जवळ ITI चौक म, गडचिरोली ,गडचिरोली,गडचिरोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

तक्रारदार हे पो.स्टे.ला हजर होताच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | वाहने आणि इतर | कार | श्री विलास माधवराव मुप्पीडवार, वय 49 वर्षे, धंदा नौकरी, पद मंडळ अधिकारी, वर्ग3, कुनघाडा मंडळ, ता | 900,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | मुप्पीडवार साहेबांनी त्यांच्या हातातील लाच रक्कम रू. 2000/ आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 902,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक 22/11/2019मी श्री सागर तुकड्दास शेंडे, वय 23 वर्षे, जात-माळी (ओ.बि.सि.), धंदा-शेती , रा. मु. माल्लेरमाल, पो. मुरमुरी, ता.पो.स्टे. चामोर्शी, जि. गडचिरोली. मी दिनांक 22/11/2019 रोजी पोलीस निरीक्षक श्री रवि गोपाळराव राजुलवार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली, यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. मी मु. माल्लेरमाल, पो. मुरमुरी, ता.पो.स्टे. चामोर्षी, जि. गडचिरोली येथील रहीवासी असुन वडीलोपार्जित शेतीमध्ये शेती करतो. माझे वडील स्व. तुकड्दास सोमा शेंडे हे दि.03/04/2018 ला मरण पावले. मला दोन बहीणी असुन त्या दोघींचे लग्न झाले आहेत. त्या आप-आपल्या सासरी नांदत आहेत. माझे वडीलांच्या नावे असलेल्या वडीलोपार्जीत शेतीवर वारसान हक्काप्रमाणे माझे नावं यावे याकरिता मी मागील महीन्यात तलाठी/सजा कार्यालय मुरमुरी येथे फेरफार होण्यासाठी अर्ज दाखल केला. त्यावेळी आर.आय. (रेव्हेन्यु इन्स्पेक्टर) श्री मुप्पीडवार साहेब मला म्हणाले कि, तुझे वडीलांच्या वारसान वर तुझे नाव चढवुन फेरफार करून पाहीजे असल्यास रू.2000/- मला दयावे लागतील. यावर मी त्यांना म्हणालो कि, सर, मी त्यांचा मुलगा आहे. वडीलांची शेती मुलाच्या नावे करायची. हे तर शासकिय कामच आहे. मग तुम्हाला पैसे कश्यासाठी द्यायचे? यावर श्री. मुप्पीडवार साहेब मला म्हणाले कि, तुमचे नावे शेतीचे फेरफार करतांना कोणतीही सरकारी आडकाठी न आणता सरकारी काम करून घ्यावे लागते. तेव्हाच रितसर शेतीवर तुझे नाव येते. त्यासाठीच तुम्हाला मला रू.2,000/- द्यावे लागतील. यावर माझेकडे पैसे नसल्याचे कारण सांगुन मी त्यांना सध्या पैसे नाहीत. नंतर बघु. असे म्हणालो.श्री. विलास मुप्पीडवार साहेब, आर.आय. (रेव्हेन्यु इन्स्पेक्टर), मंडळ अधिकारी, कुनघाडा, ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांनी माझे वडीलांच्या नावे असलेल्या वडीलोपार्जीत शेतीवर माझे वडीलांच्या मृत्युपश्यात माझे नावाचा फेरफार करण्याच्या कामी कोणतीही सरकारी आडकाठी न आणता माझे नाव चढवुन देण्याच्या कामासाठी रू.2,000/- लाच रक्कमेची मागणी करीत आहेत. श्री मुप्पीडवार साहेब, आर.आय. (रेव्हेन्यु इन्स्पेक्टर), कुनघाडा, ता. चामोर्षी, जि. गडचिरोली यांना रु.2,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी रु.2,000/- सोबत घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत

प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो आहे. श्री विलास मुप्पीडवार साहेब, आर. आय. (रेव्हेन्यु इन्स्पेक्टर), मंडळ अधिकारी, कुनघाडा, ता. चामोर्षी, जि. गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहो. मी सोबत आणलेले रु.2,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री रवि राजुलवार यांचे सोबत असलेल्या 2 शासकिय पंचांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. श्री राजुलवार यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सागुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर द्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 2,000/- (रू. 500/- दराच्या 4 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखविले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर वर पंच क्रं.1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री मुप्पीडवार साहेब, मडळ अधिकारी-कुनघाडा, यांच्या मुरमुरी येथील तलाठी कार्यालयात जाण्यास रवाना केले. श्री मुप्पीडवार, मंडळ अधिकारी-कुनघाडा यांचे कडे गेलो असता श्री मुप्पीडवार साहेब बाहेरून येवुन पोलीस पाटील श्री पुण्यपेरडीवार यांचेघरी जेवायला गेले. तेव्हा तिथे जावुन मी मुप्पीडवार साहेबांना भेटुन माझे कामाबाबत विचारणा केली असता पंच क्रं. 1 समक्ष श्री मुप्पीडवार साहेबांनी माझे वडीलांच्या मृत्युनंतर माझे व इतर वारसांचे नाव फेरफार करून माझे वडीलांच्या वडीलोपार्जीत जमीनीवर माझे तसेच इतर वारसांचे नाव चढविण्याच्या कामाकरिता रू.2,000/- (दोन हजार रूपये) लाच रकमेची मागणी करून त्यांचे जेवण पुर्ण व्हायच्या आत पैसे घेवुन ये उशीरा येशील तर मी निघुन जाईल असे म्हणुन लगेच थोडया वेळाने लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांचेकडे परत गेलो असता पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर थोडयाच वेळात सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेली लाचेची रक्कम देण्यात आली. ती माझे पंटच्या उजव्या खिश्यात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर खांद्यावरील दुपट्टा काढुन 2 वेळा झटकुन चेहरा पुसुन इषारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर वर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री मुप्पीडवार, मंडळ अधिकारी यांचे कडे मुरमुरी येथील तलाठी कार्यालयात जाण्यास रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागे-पुढे आले. त्यानंतर मी व पंच क्रं. 1 श्री मुप्पीडवार यांचेकडे जोगना मार्गे मुरमुरी येथे जात असतांना, पोहर नदीच्या पुलावर मुप्पीडवार साहेबांची स्विफ्ट डिझायर कार क्रं. MH.33.T3037 मला क्रास झाली. तसेच मुप्पीडवार साहेबांनी मला आवाज देवुन बोलावीले त्यामुळे मी माझी बाईक वळवुन त्यांचे कारजवळ गेलो असता त्याठिकाणी कारमध्ये श्री मुप्पीडवार, मडळ अधिकारी यांचेसह तलाठी श्री. महेश मडावी व तलाठी श्री साई कोडापे सोबत हजर होते. त्यावेळी मी अँथ्रसिन पावडर लावलेल्या रू.1,500/- लाचेची रक्कम माझे फुलपंटच्या उजव्या खिष्यातुन काढुन श्री मुप्पीडवार यांना दिल्या असता त्यांनी परत रू.500/- कमी असल्याचे सांगुन रु. 500/-रक्कम सोबतच्या मडावी तलाठी यांचेकडे देण्यास सांगीतले. वरून मी मुप्पीडवार साहेबांनाच पैसे दिले. मुप्पीडवार साहेबांनी त्यांच्या हातातील लाच रक्कम रू.2000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजून कारच्या समोरील कप्प्यात ठेवले व मला सोमवारी फेरफार उतारा देतो असे सांगितले.त्यावेळी माझे इशा-यावरून पंच क्रं. 1 यांनी लघविच्या निमीत्ताने रस्त्याच्या कडेलगत जावुन त्यांचे मोबाईल क्रं.9579120050 वरून पो.नि. राजुलवार साहेबांच्या मोबाईल क्रं. 9623440719 वर कॉल करून लाच रक्कम स्विकारल्याचे सांगीलते. त्यावेळी सापळा पथकाने श्री मुप्पीडवार साहेब यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री राजुलवार यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.तरी लोकसेवक श्री विलास माधवराव मुप्पीडवार, वय 49 वर्षे, धंदा - नौकरी, पद -मंडळ अधिकारी, वर्ग-3, कुनघाडा मंडळ, ता. चामोर्षी, जि. गडचिरोली रा. मारूती षोरूम जवळ, आयटीआय चैक, मु.पो.ता.जि. गडचिरोली. यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून माझे वडीलांच्या मृत्युनंतर माझे व इतर वारसांचे नाव फेरफार करून माझे वडीलांच्या वडीलोपार्जीत जमीनीवर माझे तसेच इतर वारसांचे नाव चढविण्याच्या कामाकरिता रू. 2,000/- (दोन हजार रूपये) लाच रक्कमेची मागणी करून रक्कम स्विकारली. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष( रवि जी. राजुलवार ) पोलीस निरीक्षक ला.प्र.विभाग, गडचिरोली

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** JITENDRA EKHANATH **Rank (पद):** I (Inspector)
**No.(क्र.):** POBN70652 **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
SAGAR T. Shedge

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

निशा वि. खोब्रागडे
म. पोलीस उपनिरीक्षक
पो. स्टे.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): JITENDRA EKHANATH BORKAF
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN70652

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)